दिनेश
बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक

# आकर्षण

संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २३४ । शनिवार १३ जून २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## सबका साथ, सबका विकास हा मंत्र केवळ कागदावर न राहता देशातील विकासात्मक वाटचालीतून प्रत्यक्षात उतरला - ना. राधाकृष्ण विखे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारची बारा वर्षे ही विश्वास, विकास आणि लोककल्याणाची सुवर्ण वर्षे ठरली असून, भारत देशाने नवी अर्थव्यवस्था आणि नवा आत्मविश्वास घेऊन यशस्वीपणे वाटचाल केली आहे. सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास हा मंत्र केवळ कागदावर न राहता देशातील विकासात्मक वाटचालीतून प्रत्यक्षात उतरला असल्याचे प्रतिपादन जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या कारकीर्दीस १२ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर मोदी सरकारने घेतलेल्या निर्णयांची माहिती देण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. मंत्री विखे पाटील यांनी मागील १२ वर्षांत झालेल्या महत्त्वपूर्ण निर्णयांची माहिती पत्रकारांशी बोलताना दिली.याप्रसंगी भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग उतरेचे नितीन दिनकर प्रदेश पदाधिकारी प्रा.कोरडे उपमहापौर धनंजय जाधव नगरसेवक निखिल वारे याप्रसंगी उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम व दूरदर्शी नेतृत्वामुळे देशातील सामान्य माणूस विकासाच्या मुख्य प्रवाहात आला आहे. २५ कोटी लोक प्रत्यक्षात गरिबीच्या बाहेर आले असून, देशातील ८१ कोटी लोकांना अन्नसुरक्षा योजनेचा लाभ मिळाला आहे. केंद्र सरकारने नेहमीच शेतकरी हिताला प्राधान्य दिले असून, ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून ४.२७ लाख कोटी रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. किसान क्रेडिट कार्ड योजनेच्या माध्यमातून १०.२ लाख कोटी रुपयांचे वितरण झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

देशातील १२ कोटी कुटुंबांना आयुष्यमान भारत योजनेचा लाभ मिळाला असून, ५ लाख रुपयांपर्यंतच्या मोफत उपचारांचा यामध्ये समावेश आहे. ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांनाही या योजनेचा लाभ देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून, प्रधानमंत्री आवास योजनेतून आतापर्यंत ४ कोटी कुटुंबांना घरांची उपलब्धता करून देण्यात आली आहे.
केंद्र सरकारने नेहमीच महिलांच्या सक्षमीकरणाला प्राधान्य दिले असून, ३ कोटी लखपती दीदी देशामध्ये निर्माण झाल्या आहेत. राज्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली १ कोटी लखपती दीदी बनविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. मागील १२ वर्षांच्या कार्यकाळात देशातील अन्नधान्याच्या उत्पादनात ७० टक्के ही ऐतिहासिक वाढ झाली असून, अन्नदाता सक्षम आणि आत्मनिर्भर होण्याच्या दृष्टीने शासनाचे प्रयत्न आहेत. दूध उत्पादनातही मागील १० वर्षांत ६९.४ टक्के वाढ झाली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार प्रत्येक थेंबातून अधिक पीक यासाठी १०९ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यात आले असून, पाण्याच्या बचतीबरोबरच शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ झाली आहे. देशात आणि राज्यात नदीजोड प्रकल्पांना दिलेले प्राधान्य आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतून अपूर्ण कामांना मिळालेली गती याचे सकारात्मक परिणाम पाहायला मिळत असल्याचे ना. विखे पाटील म्हणाले. देशात १.४६ लाख कि.मी. पर्यंतच्या महामार्गांची कामे, रेल्वेचे आधुनिकीकरण आणि देशातील १,३३७ रेल्वे स्थानकांना आधुनिक दर्जा मिळवून देण्यासाठी काम सुरू झाले आहे. १६४ हून अधिक वंदे भारत ट्रेन सध्या नागरिकांना सुविधा देत आहेत. देशामध्ये डिजिटल क्रांतीची सुरुवात पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली झाली असून, यामुळे सामान्य माणसाच्या राहणीमानातील सुलभता वाढून

■ पान ४ वर

## आमदार संग्राम जगताप यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा; नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव

**'बुके नको, विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करा' - आमदार संग्राम जगताप यांच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद । शालेय साहित्य वाटप, सामाजिक बांधिलकी आणि जनसंपर्काचा अनोखा संगम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहराचे लोकप्रिय आमदार संग्राम जगताप यांचा वाढदिवस यंदा विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा करण्यात आला. राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच नाट्य क्षेत्रातील मान्यवरांसह हजारो नागरिकांनी आमदार संग्राम जगताप यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. शहरभर विविध ठिकाणी सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या उपक्रमांमधून समाजोपयोगी संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

वाढदिवसानिमित्त आमदार संग्राम जगताप यांनी नागरिकांना एक वेगळे आणि प्रेरणादायी आवाहन केले होते. "माझ्या वाढदिवसानिमित्त कोणीही बुके, हार किंवा पुष्पगुच्छ आणू नयेत. त्याऐवजी समाजोपयोगी उपक्रम राबवावेत, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करावे आणि सामाजिक बांधिलकी जपत एखाद्या गरजवंताच्या चेहऱ्यावर हास्य फुलवावे," असे आवाहन त्यांनी केले होते.

आमदार संग्राम जगताप यांच्या या आवाहनाला नागरिकांनी, कार्यकर्त्यांनी आणि विविध सामाजिक संस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शहरातील विविध भागांमध्ये विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन, शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. अनेक ठिकाणी वृक्षारोपण, आरोग्य शिबिरे, अन्नदान, फळवाटप, रक्तदान आणि इतर सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. त्यामुळे वाढदिवसाचा उत्सव केवळ शुभेच्छांपुरता मर्यादित न राहता समाजहिताच्या कार्यामध्ये रूपांतरित झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

आमदार संग्राम जगताप यांनी सकाळी नऊ वाजल्यापासून ते सायंकाळी उशिरापर्यंत नागरिकांच्या शुभेच्छा स्वीकारल्या. त्यांच्या कार्यालयासमोर आणि विविध कार्यक्रमस्थळी शुभेच्छा देण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी उसळली होती. विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, व्यापारी, शिक्षक, डॉक्टर, सामाजिक कार्यकर्ते आणि सर्वसामान्य नागरिकांनी भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी अनेकांनी आमदार संग्राम जगताप यांच्या विकासकामांचा, जनसंपर्काचा आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांबाबत असलेल्या संवेदनशीलतेचा गौरव केला. शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि विविध विकासकामांसाठी त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे नागरिकांनी त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

शहरातील विविध सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक संस्थांनी देखील वाढदिवसानिमित्त अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सामाजिक कार्यातून वाढदिवस साजरा करण्याची परंपरा अधिक बळकट करण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी दिलेला संदेश प्रेरणादायी असल्याचे मत अनेक नागरिकांनी व्यक्त केले.

वाढदिवसानिमित्त झालेल्या विविध सामाजिक उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक संदेश गेला असून, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून शिक्षणाला प्रोत्साहन देण्याचे महत्त्व अधोरेखित झाले. समाजोपयोगी कार्यातून वाढदिवस साजरा करण्याचा हा उपक्रम अनेकांसाठी आदर्श ठरल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## वृद्ध शेतकरी खून प्रकरणातील फरार आरोपीला १२ तासांत बेड्या

**स्थानिक गुन्हे शाखेची मढी शिवारात शोध मोहीम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीगोंदा तालुक्यातील पिसोरेखांड येथे शेताच्या बांधावर मुरुम टाकण्याच्या किरकोळ वादातून एका ७५ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याची कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली होती. या खळबळजनक घटनेतील मुख्य फरार आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या १२ तासांच्या आत पाथर्डी तालुक्यातील मढी शिवारात शोध मोहीम राबवून शिताफीने ताब्यात घेत बेड्या ठोकल्या आहेत. विलास दादा गावडे (वय ५५, रा. पिसोरेखांड, ता. श्रीगोंदा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

**पथकात यांचा सहभाग**

**शोध पथकात पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, गणेश धोत्रे, फुरकान शेख, शाम जाधव, मनोज साखरे, भगवान थोरात, अमोल कोतकर, प्रशांत राठोड, उत्तरेश्वर मोराळे आणि चंद्रकांत कुसळकर यांचा सहभाग होता.**

पिसोरेखांड गावच्या शिवारात शेताच्या बांधावर मुरुम टाकण्यावरून आरोपी विलास गावडे आणि पोपटराव रावजी गावडे (वय ७५) यांच्यात किरकोळ ■ पान ४ वर

## तलवार बाळगणारा सराईत गुन्हेगार जेरबंद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** घातपात करण्याच्या उद्देशाने घातक शस्त्र बाळगणाऱ्या एका सराईत गुन्हेगाराला तोफखाना पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने शिताफीने अटक केली आहे. सुमेध उर्फ टिंग्या किशोर साळवे (वय २९, रा. नीलक्रांती चौक, अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून पोलिसांनी २७ इंच लांबीची लोखंडी तलवार जप्त केली आहे.

दिनांक १२ जून रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास गुन्हे शोध पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर यांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली की, जुना बोल्हेगाव रोडवरील नवीन पुलाच्या पुढे एका लिंबाच्या झाडाजवळ हिरवा शर्ट आणि निळी टोपी घातलेला एक इसम संशयास्पदरित्या फिरत असून, घातपात करण्याच्या उद्देशाने त्याच्याकडे तलवार आहे. मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे उपनिरीक्षक चाहेर यांनी पथकासह तात्काळ घटनास्थळी धाव घेत सापळा रचला आणि संशयित आरोपी 'टिंग्या' याला ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता एक हजार रुपये किमतीची तलवार मिळून आली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात आर्म

■ पान ४ वर

## विहामांडवा येथील केंद्रीय प्राथमिक शाळेत चोरी

**पोषण आहार कक्षाचे कुलूप तोडून साहित्य लंपास**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** तालुक्यातील विहामांडवा येथील केंद्रीय प्राथमिक शाळेतील शालेय पोषण आहार कक्षाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश करत पोषण आहारासाठी साठवून ठेवलेले साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे शाळा परिसरात खळबळ उडाली आहे. शुक्रवारी सकाळी शाळा सुरू झाल्यानंतर पोषण आहार कक्षाचे कुलूप तुटलेले असल्याचे निदर्शनास आले. यानंतर कक्षाची पाहणी केली असता आत ठेवण्यात आलेल्या काही वस्तू चोरीस गेल्याचे आढळून आले. घटनेची माहिती मिळताच विहामांडवा पोलीस चौकीचे बिट जमादार विजय बामंदे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

चोरीस गेलेल्या साहित्याचा तपशील व किंमत निश्चित करण्याचे काम सुरू असून अज्ञात चोरट्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या पोषण आहारासाठी असलेल्या साहित्याची चोरी झाल्याने ग्रामस्थांकडून नाराजी व्यक्त होत असून शाळांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## गोदावरीत स्नान करताना तरुण भाविकाचा बुडून मृत्यू

**जायकवाडी धरणाच्या पायथ्याशी घडली दुर्दैवी घटना**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** धोंड्याच्या वारीनिमित्त गोदावरी नदीत स्नानासाठी आलेल्या एका तरुण भाविकाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी जायकवाडी धरणाच्या पायथ्याशी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

अमोल मोहन सावंत (वय २५, रा. नागगाव खंडेवाडी, ता. पैठण) असे मृत भाविकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अमोल सावंत हा आई व बहिणीसह गोदावरी स्नानासाठी आला होता. गजगडबाबा मंदिराजवळ तो नदीत अंघोळ करत असताना पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने तो अचानक खोल पाण्यात गेला आणि बुडाला.

घटना लक्षात येताच त्याच्या आई व बहिणीने मदतीसाठी आरडाओरडा केला. परिसरातील नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर पोलीस कर्मचारी विलास सुखबालन, गणेश साबळे तसेच नगर परिषदेच्या अग्निशमन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी शोधमोहीम राबवून अमोलचा मृतदेह पाण्याबाहेर काढला.

मृतदेह शवविच्छेदनासाठी पैठण येथील शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. या प्रकरणी पैठण पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, धोंड्याच्या वारीनिमित्त गोदावरी घाटांवर भाविकांची मोठी गर्दी होत असून खोल पाण्यात न जाण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

## उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेवक निखिल वारे यांच्याकडून १०० वृक्षांची अनोखी भेट

**नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेला बळ; पर्यावरण संवर्धनासाठी लोकचळवळ उभारण्याचे आवाहन**
**वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करा, बुकेऐवजी वृक्ष भेट द्या – ॲड. धनंजय जाधव**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** पर्यावरण संवर्धन आणि हरित शहराच्या संकल्पनेला बळ देणारा आदर्श उपक्रम म्हणून मनपा उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेवक निखिल वारे यांनी १०० वृक्षांची भेट देत अनोख्या पद्धतीने शुभेच्छा दिल्या. या उपक्रमामुळे नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेला अधिक गती मिळणार असून शहरामध्ये वृक्षारोपण व संवर्धनाची लोकचळवळ उभारण्यासाठी हा उपक्रम प्रेरणादायी ठरणार आहे.



यावेळी उद्योजक जनक अहुजा, उद्योजक आदेश चेंगडिया, राजेंद्र बलदोटा, अभिजीत बोरुडे, सुहासभाई मुळे,स्वप्निल दगडे,मितेश शहा,विजय वडागळे,संदीप पवार,सुनिल कुलकर्णी सर,शिक्षक नेते वैभव सांगळे सर,प्रविण दुस्सा,संतोष शिरसाठ आदी उपस्थित होते.

यावेळी नगरसेवक निखिल वारे म्हणाले की, आपण समाजामध्ये वावरत असताना समाजाचे काहीतरी देणे लागते या भावनेतून उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी सकारात्मक दृष्टिकोनातून सामाजिक बांधिलकी जोपासत पर्यावरणाच्या समतोलासाठी नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेच्या माध्यमातून नगरकरांना आवाहन करत वृक्षारोपण व संवर्धनाची लोकचळवळ उभी केली आहे. या मोहिमेत नगरकरांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपले कर्तव्य पार पाडावे.

ते पुढे म्हणाले की, या मोहिमेसाठी

■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यादेवींच्या जन्मगावी उद्या लेक-जावयांना धोंडे जेवण

अहिल्यानगर - सध्या अधिक मास सुरू असून, यानिमित्त लेक-जावयाला घरी बोलावून त्यांचा सन्मान करण्याची व त्यांच्यासाठी पुरणाचे धोंडे करण्याची परंपरा मराठी कुटुंबीयांतून सुरू आहे. हीच परंपरा आख्ख्या गावासाठी साजरी करण्याचा अनोखा सोहळा उद्या रविवारी (१४ जून) चौंडी (ता. जामखेड) येथे सकाळी ९ वाजता होणार आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या पुढाकाराने हा आगळावेगळा सोहळा होणार आहे. यानिमित्ताने लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगावी चौंडी गावातील लेक-जावयांचा सन्मान व त्यांच्यासाठी धोंडे जेवण सोहळा होणार असून, अशा पद्धतीने एखाद्या गावाचा धोंडे जेवण सोहळा अहिल्यानगर जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात पहिल्यांदाच होत आहे. या कार्यक्रमाची माहिती देताना सभापती प्रा. शिंदे यांनी सांगितले की, चौंडी नगरीतील लाडक्या लेक-जावयांचा धोंडे जेवण व सन्मान सोहळा हा केवळ एक कार्यक्रम नसून गावातील विविध कुटुंबातील लेकी आणि जावई यांच्याप्रती असलेली कृतज्ञता, प्रेम, जिव्हाळा आणि सन्मान व्यक्त करणार्या आपल्या समृद्ध संस्कृतीचा आणि परंपरेचा एक आगळावेगळा उत्सव आहे. लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पावन जन्मभूमीत आयोजित या स्नेहसोहळ्यात सहभागी होऊन आपल्या संस्कारांचा, नात्यांचा आणि परंपरेचा हा सुंदर उत्सव अनुभवावा, असे आवाहनही प्रा. शिंदे यांनी केले. उद्या रविवारी, (दि. १४ जून) रोजी चोंडी (ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) येथे सकाळी ९ वाजता हा सोहळा होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ व्या जयंती व अधिक मासानिमित्त चोंडी नगरीतील लेकी आणि जावयांचा धोंडे जेवण सन्मान सोहळा उद्या सकाळी ९ वाजल्यापासून दुपारी ३ वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. सकाळी ९ वाजता लेक जावयांचे चोंडी येथे आगमन झाल्यानंतर जावयांना फेटा बांधण्याचा कार्यक्रम होणार आहे. त्यानंतर लेक-जावयांची स्वागत मिरवणूक काढली जाणार आहे. सकाळी १० वाजता अहिलेश्वर मंदिर येथे लेक-जावयांचे आगमन व दर्शन होणार आहे. तेथेच सर्वांचे एकत्रित स्मरणीय समूह छायाचित्रण केले जाणार आहे. त्यानंतर माणकोजीराव शिंदे सभागृहात मुख्य सोहळा होणार आहे. सुरुवातीला प्रतिमा पूजन व सत्कार समारंभ झाल्यावर मार्गदर्शन व मनोगत होणार आहे. त्यानंतर दुपारी १२.३० वाजता धोंडे जेवण झाल्यावर लेक-जावयांचा सन्मान व भेट वस्तू वाटप होणार आहे. चौंडी ग्रामस्थांच्या पुढाकाराने या सोहळ्याचे नियोजन करण्यात आले असून, यात चौंडीच्या लेक-जावयांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### पै. नाना डोंगरे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर

अहिल्यानगर- पुणे येथील अल्बोस टेक्नॉलॉजी यांच्या सौजन्याने सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांना महाराष्ट्र भूषण २०२६ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पुणे येथे दि. २० जून रोजी होणाऱ्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात येणार असल्याची माहिती कार्यक्रमाचे संयोजक रोहित गांधी यांनी दिली. या पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी साहित्यिक सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी, सिने अभिनेत्री माधुरी पवार, आशू सुरपूर, संदिप रासकर आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत.स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत असलेले पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह जिल्हाभर विविध सामाजिक उपक्रमांद्वारे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागात सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य आणि धार्मिक क्षेत्रात त्यांनी सातत्यपूर्ण व प्रभावी कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी अनेक विधायक उपक्रम राबविण्यात आले आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन मोहिमा, स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जनजागृती, जलसंधारण जनजागृती, रक्तदान शिबिरे अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे त्यांनी समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांचे आयोजन करून ग्रामीण नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे कार्यही सातत्याने सुरू आहे.

# ग्रीनसीटी प्रकल्पासाठी सकल माळी समाज सरसावला

**उपमहापौर जाधव यांच्या संकल्पनेतून संकल्पनेतून ग्रीनसीटी प्रोजेक्ट ठरणार आदर्श - रामदास फुले**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** प्रतिनिधी–ग्रीन सिटी मोहिमेचे पुरस्कर्ते उपमहापौर धनंजय जाधव यांनी नगर शहराच्या पर्यावरण चळवळीला मोठे बळ दिले आहे.कोरोना काळापासून ऑक्सिजनची कमी जाणविल्याने अनेकांना अडचणींना सामोरे जावे लागले. ''झाडे लावा झाडे जगवा''या संकल्पनेतून नगर शहराच्या विकासाला मोठी चालना उपमहापौर धनंजय जाधव यांनी दिली आहे.ग्रीन सिटी या मोहिमेमुळे नगर शहराचे पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन होईलच तसेच नगर शहराचे नंदनवन लवकरच होईल.या ग्रीन सिटी मोहिमेसाठी सकल माळी समाज सरसावला आहे.उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून साकारणारे ग्रीनसीटी प्रोजेक्ट ठरणार आदर्श पर्यावरण प्रकल्प असे प्रतिपादन सकल माळी समाजाचे नेप्ती विभाग प्रमुख रामदास फुले यांनी केले आहे.

उपमहापौर धनंजय जाधव यांचा सकल माळी समाजाच्या वतीने सत्कार करून सन्मान करण्यात आला . तसेच शहरात राबवणारे ग्रीन सिटी प्रोजेक्ट ला सकल माळी समाजाने पाठिंबा दिला आहे.याप्रसंगी सकल माळी समाजाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,विश्वस्त विनोद पुंड, राजेंद्र पडोळे,नेप्ती विभाग प्रमुख रामदास फुले,कोरकमिटी सदस्य अनिल इवळे,अमोल भांबरकर,चंद्रकांत पुंड,कॅप्टन सुधीर पुंड,सुरेश कावळे, रमेश चिपाडे,डॉ. दामोदर कळमकर, रोहित पठारे, गणेश कोल्हे आदी उपस्थित होते.

बाळासाहेब भुजबळ म्हणाले, उपमहापौर धनंजय जाधव यांनी अहिल्यानगर शहराला दिशा देणारा ग्रीन सिटी प्रकल्प हाती घेतला आहे.या ग्रीन सिटी प्रोजेक्ट ला शहरातील नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला आहे.सध्याच्या काळात वाढते तापमान कमी होणेसाठी पर्यावरणाच्या दृष्टीने शहरात मोठ्या प्रमाणात झाडे लावण्याची गरज आहे. महानगरपालिकेच्या वतीने उपमहापौर धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून सुरू केलेल्या ग्रीन सिटी प्रोजेक्ट या प्रकल्पास सकलमाळी समाज पाठिंबा देत आहे. शहरात वृक्षारोपणाचे कार्यक्रम ठीक ठिकाणी आयोजन करण्यासाठी सकल माळी समाज पुढाकार घेईल.असे सांगितले आहे.

# नेवासा पोलिस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकपदी धडाकेबाज प्रताप दराडे यांची नियुक्ती; गुन्हेगारांचे धाबे दणाणले!

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** नेवासा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकपदी अखेर एका कडक आणि दबंग अधिकाऱ्याची एंट्री झाली आहे. आपल्या धडाकेबाज कामगिरीसाठी प्रसिद्ध असलेले पोलीस निरीक्षक प्रताप दराडे हे नेवासा पोलीस ठाण्याचा लवकरच पदभार स्वीकारणार असून, त्यांच्या नियुक्तीमुळे तालुक्यातील गुन्हेगारांचे चांगलेच धाबे दणाणले आहेत.



प्रताप दराडे यांची पोलीस दलात एक दबंग आणि सिंघम अधिकारी म्हणून ओळख आहे. अवैध धंदे, गुन्हेगारी आणि कायदा–सुव्यवस्था बिघडवणाऱ्या प्रवृत्तींना त्यांनी नेहमीच आपल्या कडक स्टाईलने चाप लावला आहे. नेवासा तालुक्यात गेल्या काही दिवसांतील गुन्हेगारीची पार्श्वभूमी पाहता, आता दराडे यांच्यासारखा सिंघम अधिकारी मिळाल्याने सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. गुन्हेगारांची आता खैर नाही!पदभार स्वीकारताच पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी आपल्या कामाचा धडाका सुरू करण्याचे संकेत दिले आहेत. ''तालुक्यात शांतता व सुव्यवस्था राखणे ही आपली पहिली प्राथमिकता असेल. अवैध धंदेवाले आणि गुन्हेगारांची गय केली जाणार नाही,'' असा कडक इशाराच एकप्रकारे त्यांच्या नियुक्तीने गुन्हेगारी जगताला मिळाला आहे.

अनेक कठीण मोहिमा फत्ते करत आपल्या धडाकेबाज कामगिरीचा ठसा उमटवणारे प्रताप दराडे आता नेवासा पोलीस ठाण्याचा कारभार कसा सांभाळतात आणि गुन्हेगारीचा बिमोड कसा करतात, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. मात्र, त्यांच्या या सिंघम एन्ट्रीने तालुक्यात गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक निर्माण होणार हे मात्र नक्की!

# अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या धडक कारवाईने राज्यभरात खळबळ

**पुण्यातून आणखी एक डॉक्टर अटक, ५ सोनोग्राफी मशीन जप्त**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**श्रीरामपूर–** लोणी पोलीस स्टेशनच्या हद्दीत उघडकीस आलेल्या अवैध लिंगनिदान चाचणी आणि बेकायदेशीर गर्भपात प्रकरणाचा तपास श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत शास्त्रोक्त आणि बारकाईने सुरू आहे. या रॅकेटची पाळेमुळे थेट पुणे आणि नाशिकपर्यंत पसरली असून, पोलिसांनी काल पुणे (वाघोली) येथील आणखी एका मोठ्या डॉक्टरला बेड्या ठोकल्या आहेत. आतापर्यंत या आंतरजिल्हा रॅकेटमधील एकूण २१ आरोपींना अटक करण्यात आली असून, यात ७ डॉक्टर आणि ३ मेडिकल चालकांचा समावेश असल्याने वैद्यकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

तपासाची साखळी आणि पोलिसांची धडक कारवाई सुरुवातीला लोणी पोलिसांनी नेवासा येथील डॉक्टर भणगे, दोन एजंट आणि ६ नातेवाईक अशा ९ जणांना अटक करून एक पोर्टेबल सोनोग्राफी मशीन आणि ३ चारचाकी गाड्या जप्त केल्या होत्या. परंतु, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी तपासाची चक्रे गतीने फिरवत या संपूर्ण रॅकेटचा सखोल माग काढला.

त्यानंतर तपासादरम्यान: ढगे नामक आरोपीकडून दुसरे पोर्टेबल सोनोग्राफी मशीन जप्त करण्यात आले. श्रीरामपूर येथील डॉक्टर कुटे व डॉक्टर शेख यांना लिंगनिदान आणि गर्भपात प्रकरणी अटक झाली. पुणे येथून बेकायदेशीर मशीन विक्री करणारे दोन डॉक्टर आणि एका पुरवठादाराला अटक करण्यात आली. वडगाव मावळ येथील मारुती ढोरे याला अटक करून त्याच्याकडून मशीन जप्त करण्यात आले.

नाशिकच्या निफाड तालुक्यातील डॉक्टर कुणाल वलटे आणि मेडिकल चालक सागर उन्हाळ यांनाही श्रीरामपूर अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या पथकाने शोध घेऊन ताब्यात घेतले. श्रीगोंदा तालुक्यातील घोगरगाव येथील मेडिकल चालक जालिंदर रामदास बोरुडे याला अटक करण्यात आली. त्याच्या चौकशीतून अनेक महिलांची बेकायदेशीर चाचणी केल्याचे समोर आले.

नुकतेच पुण्यातून डॉक्टर तर कर्जत मधून एजंट अटकेत तपासाचा रोख थेट पुणे आणि कर्जत तालुक्याकडे वळवून पोलिसांनी आणखी दोन मोठ्या माशांना गळाला लावले आहे.

१) राम किसन पवार उर्फ तपोश शिबू सरकार (रा. मलठण, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर): जालिंदर बोरुडे याला मदत करणारा हा मुख्य एजंट असून, काल त्याला पथकाने ताब्यात घेतले. त्याच्याकडे अवैधरित्या गर्भपातासाठी लागणाऱ्या गोळ्यांचा साठा मिळून आला आहे. न्यायालयाने त्याला १६ जूनपर्यंत (६ दिवस) पोलीस कोठडी सुनावली आहे. २) डॉ. अतुल अंकुश जाधव (रा. वाघोली, पुणे): तपासात पुणे येथील या डॉक्टरचे नाव समोर आल्यानंतर काल त्याला तातडीने अटक करण्यात आली. हा डॉक्टर देखील बेकायदेशीर गर्भलिंग निदान चाचण्या करत असल्याचे निष्पन्न झाले असून, त्यालाही न्यायालयाने ६ दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

आतापर्यंतची मोठी जप्ती आणि अटकेची आकडेवारी

एकूण अटक आरोपी २१ जण अटक केलेले डॉक्टर्स०७
अटक मेडिकल चालक ०३, मेडिकल साहित्य पुरवठादा०१
जप्त सोनोग्राफी मशीन०५ (पोर्टेबल) जप्त वाहने४ चारचाकी, १ दुचाकी

मुख्य मार्गदर्शक आणि तपास यंत्रणा

अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षक एम. सुदर्शन आणि श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या थेट लीड आणि मार्गदर्शनाखाली डीवायएसपी भारती व सहाय्यक पोलीस निरीक्षक आठरे हे या गुन्ह्याचा पुढील अत्यंत संवेदनशील आणि सखोल तपास करत आहेत. या रॅकेटमध्ये महाराष्ट्रातील आणखी काही मोठी नावे समोर येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

# पेमराज सारडा महाविद्यालयाचा मयंक पाखरे सायकलिंग स्पर्धेत प्रथम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नुकत्याच पेमराज सारडा महाविद्यालय मध्ये सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया,खेलो इंडिया, अंतर्गत वर्ल्ड सायकल डे निमित्त राज्यस्तरीय सायकलिंग स्पर्धेचे विविध गटांमध्ये आयोजन केले होते. या सायकलिंग स्पर्धेसाठी विविध जिल्ह्यांतून नामांकित खेळाडू नी सहभाग घेतला होता. त्यामध्ये पेमराज सारडा महाविद्यालयाचा मयंक पाखरे या खेळाडूने अटीतटीच्या सामन्यात शेवटच्या टप्प्यात मुसंडी मारुन प्रथम क्रमांक पटकावला.तसेच १७वर्ष वयोगटातील प्रथम क्रमांक–अनुष्का मिसाळ, द्वितीय क्रमांक –गौरी कुल्लाळ,तृतीय क्रमांक–निशा फंड, १९ वर्ष वयोगटातील प्रथम क्रमांक –भाग्यश्री पालवे, द्वितीय क्रमांक –फौजिया शेख आदींनी स्पर्धेत यश मिळविले आहे.विजेते स्पर्धकांना तोफखाना पोलीस स्टेशन चे पी.आय. जगदीश भांबळ यांच्या हस्ते रोख रक्कम व चषक देऊन खेळाडूंचा गौरव करण्यात आला.

विजेते खेळाडूंचे अभिनंदन हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, मानद सचिव संजय जोशी, हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, पेमराज सारडा कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा,डॉ.पारस कोठारी,ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा,अँड.अनंत फडणीस,डॉ.रमेश झरकर, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा,प्रा.ज्योती कुलकर्णी,अनंत देसाई,प्राचार्य प्रा.डॉ.माहेश्वरी गावित,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे,पर्यवेक्षक प्रा.सुजित कुमावत आदींनी विजेते खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

# स्व.शंकरराव घुले यांनी कष्टकऱ्यांसाठी आपले जीवन समर्पित केले - डॉ गिरीश कुलकर्णी

**स्व.शंकरराव घुले राज्यस्तरीय 'गुणवंत कामगार पुरस्कारा'चे वितरण**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्व.शंकरराव घुले यांनी हमाल–मापाडी यांचे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर राज्यस्तरावर आवाज उठवून त्यांना त्यांचे हक्क मिळवून दिले. त्यामुळे कष्टकार्यांना प्रतिष्ठा मिळू लागली. त्याचबरोबर पतसंस्थेच्या माध्यमातून त्यांची आर्थिक घडी बसविण्याचे काम करुन एकप्रकारे स्थैर्य निर्माण केले. त्यांचे कष्टकार्यांप्रती असलेले प्रेम व त्यांच्या प्रश्नांची जाण असणारा नेता म्हणून जनमानसात त्यांची प्रतिमा नेहमीच उंचावत गेली. नगराध्यक्ष, कुस्तीपटू,साहित्य अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील कार्यातून त्यांनी आपले कर्तुत्व सिद्ध केले. त्यांनी कष्टकर्यांसाठी आपले जीवन समर्पित केले, त्यांची उणिव आपणा सर्वांना कायम जाणवत राहील. आता अविनाश घुले हे त्यांचा वारसा समर्थपणे चालवून कष्टकर्यांसाठी करत असलेले कार्यात आपणही सहभागी होवू. आज स्व.घुले यांच्या नावे दिला जाणारे पुरस्कार हे त्यांच्या कार्याचे प्रतिक कायम कष्टकर्यांना प्रेरणादायी राहील, असे प्रतिपादन स्नेहालय चे विश्वस्त डॉ गिरीश कुलकर्णी यांनी केले.

जिल्हा हमाल पंचायतचे माजी अध्यक्ष स्व.शंकरराव घुले जयंतीनिमित्त राज्यस्तरीय 'गुणवंत कामगार पुरस्कारा'चे वितरण स्नेहालय चे विश्वस्त डॉ गिरीश कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी सहायक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले एस एम जोशी फोंडेशन चे अध्यक्ष सुभाष वारे ,जिल्हा हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले, कॉ.बाबा आरगडे, गोविंद सांगळे, मधुकर केकाण, पतसंस्थेचे चेअरमन रविंद्र भोसले , व्हा.चेअरमन नवनाथ बडे ,संचालक संजय घुले ,आदिनाथ चेके ,मछिंद्र दहिफळे ,,सागर पोळ ,मंदाबाई सूर्यवंशी ,रतनबाई आजबे ,राम सरोदे ,संजय महापुरे आदि उपस्थित होते.

यावेळी पुणे येथील एस एम जोशी फोंडेशन चे अध्यक्ष सुभाष वारे म्हणाले कि कष्टकार्यांचे जीवनमान उंचविण्याचे काम स्व.शंकरराव घुले यांनी केले. त्यांनी कामगारांच्या प्रश्नांसाठी मोठे आंदोलन उभे करुन त्यांना त्यांचे हक्क मिळवून दिले. त्यांच्या आंदोलनामुळे कष्टकर्यांसाठीच्या अनेक सरकारी योजना प्रत्यक्षात अंमलात आल्या. आपले हक्क मिळवयाचे असेल तर संघटन हे महत्वाचे हे ओळखून त्यांनी राज्यभरातील कष्टकार्यांसाठी मौलिक काम केले आहे.

# श्रीमद्भागवत आणि भगवद्गीता हे भारतीय संस्कृतीचे अमूल्य आध्यात्मिक वैभव - भागवताचार्य ह.भ.प. भगवान डोशी महाराज

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अधिक मासाच्या अखेरच्या सप्ताहात आयोजित करण्यात आलेल्या श्रीमद्भागवत कथा सार ग्रंथ निरूपण सोहळ्याला अत्यंत भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री काळेश्वर मंदिरात दर्शन घेऊन मंजुळ स्वरातील भजन, नामसंकीर्तन आणि शोभायात्रा काढण्यात आली. या मंगलमय वातावरणामुळे परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.



या भागवत सप्ताहाच्या यजमानपदाचा लाभ श्री संतोष रसाळ व सौ. सुखदा रसाळ यांना लाभला. त्यांच्या हस्ते श्रीमद्भागवत ग्रंथाचे पूजन तसेच निरूपणकार भागवताचार्य ह.भ.प. भगवान डोशी महाराज (छत्रपती संभाजीनगर) यांचे विधिवत स्वागत व पूजन करण्यात आले. धार्मिक विधी वे. ना. उमेश वाळुंजकर व बंडोपंत धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाले.

यावेळी आपल्या निरूपणात भागवताचार्य ह.भ.प. भगवान डोशी महाराज म्हणाले की, ''श्रीमद्भागवत हा ग्रंथ मनुष्याचे जीवन आणि त्याचा शेवट किती मंगलमय, यशस्वी व मोक्षदायी होऊ शकतो, याचे उत्कृष्ट दर्शन घडवितो. राजा परीक्षिताच्या जीवनातून हे सत्य स्पष्टपणे समोर येते. रामायण आपल्याला आदर्श संसार कसा करावा हे शिकवते, तर महाभारत जीवनातील संघर्ष, कर्तव्य आणि धर्माचे तत्त्वज्ञान समजावून सांगते. रामायण आणि महाभारत ही भारतीय संस्कृतीची ओळख आहेत, तर श्रीमद्भागवत आणि भगवद्गीता हे भारतीय संस्कृतीचे अमूल्य आध्यात्मिक वैभव आहे.''

पुढे ते म्हणाले की, ''या ग्रंथांचे चिंतन अत्यंत एकाग्रचित्ताने करणे आवश्यक आहे. त्यासाठी इंद्रियसंयम, मनावर नियंत्रण आणि ईश्वरभक्ती आवश्यक आहे. राजा परीक्षिताने आपल्या आचरणातून हे जगासमोर सिद्ध करून दाखविले आहे.''

निरूपणादरम्यान गोकर्ण आख्यानाचे प्रभावी आणि रसाळ विवेचन करण्यात आले. या आख्यानाने उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. भागवत कथा सार निरूपणामुळे अधिक मास अधिक फलदायी, पुण्यदायी आणि आध्यात्मिकदृष्ट्या परिपूर्ण होत असल्याची भावना उपस्थित भक्तांमध्ये व्यक्त होत होती.

संपूर्ण अधिक मासभर विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संगीत गुरुचरित्र पारायण, नारदीय कीर्तन, अभ्यासपूर्ण प्रवचने, गीता मंडळाच्या वतीने श्री ज्ञानेश्वरी पारायण, तसेच विविध धार्मिक ग्रंथांचे सामूहिक वाचन यांचा समावेश होता. एवढेच नव्हे तर दररोज सकाळी ८ ते १२ या वेळेत श्रीविष्णुसहस्रनाम पठण, पूजन, विष्णुयाग व इतर धार्मिक विधी नियमितपणे पार पडत होते. त्यामुळे संपूर्ण महिनाभर परिसरात भक्ती, साधना आणि अध्यात्माचा सुरेख संगम अनुभवायला मिळाला.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### बॉलर्स क्लब बास्केटबॉल प्रशिक्षण केंद्राचा शुभारंभ



अहिल्यानगर- आनंदी व निरामय जगण्यासाठी दैनंदिन जीवनात खेळ अत्यंत आवश्यक आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या फिटनेस आणि क्रीडा संस्कृती संवर्धनासाठी बॉलर्स क्लबने सुरू केलेल्या बास्केटबॉल प्रशिक्षण केंद्रात चांगले खेळाडू घडतील असा आत्मविश्वास माजी क्रिकेटपटू किशोर गांधी यांनी व्यक्त केला. साईनगर, बुरूडगाव रोड परिसरात बॉलर्स क्लबने नव्याने सुरू केलेल्या बास्केटबॉल प्रशिक्षण केंद्राच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. मैदानाचे पूजन व शुभारंभ प्रसंगी ॲड. राजेंद्र सेलोत, डॉ. हेमा सेलोत, बबिता गांधी, चेतन आगरवाल, कृष्णाली सेलोत आदींसह खेळाडू मुले, मुली उपस्थित होते.या प्रशिक्षण केंद्रासाठी बॉलर्स क्लबचे संचालक ॲड. हर्षल सेलोत, आंतरराष्ट्रीय कॉर्फबॉल खेळाडू दिशान गांधी आहेत. शालेय मुलामुलींना घडवण्याचा त्यांचा ध्यास आहे. या मैदानासाठी चिराग शेटिया, धनेश लोढा, परेश लोढा, धनंजय भोसले यांचे सहकार्य लाभले आहे. बॉलर्स क्लबचे प्रशिक्षक हर्षल सेलोत व दिशान गांधी हे स्वतः निष्णात बास्केटबॉल खेळाडू आहेत. खेळाप्रती आवडीच्या ध्यासातून नवनवीन गुणी खेळाडू घडवण्याचा त्यांचा मानस आहे. आयकॉन पब्लिक स्कूल व सावेडी परिसरातही त्यांचे प्रशिक्षण वर्ग चालू आहेत.

### सीलबंद तुपाच्या बाटलीत माशीसदृश गोष्ट आढळल्याचा ग्राहकाचा दावा!!

कर्जत - अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे डेअरी स्टार अगमार्क काऊ घी (गाईचे तूप) या नावाच्या ब्रँडच्या सीलबंद तुपाच्या बाटलीत माशीसदृश वस्तू आढळल्याचा दावा ग्राहकाने केला आहे. याप्रकरणी संबंधित ग्राहकाने अन्न सुरक्षा विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार नामदेव रमेश दळवी (रा. तिखी , ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी मिरजगाव येथील एका किराणा दुकानातून ५०० मि.ली. वजनाची डेअरी स्टार अगमार्क काऊ घी खरेदी केले होते. बाटली सीलबंद अवस्थेत असताना तिच्या तळाशी माशीसदृश वस्तू दिसून आल्याचा दावा त्यांनी केला आहे. तक्रारदार दळवी यांनी उत्पादनाचे फोटो व खरेदीची माहिती अन्न सुरक्षा विभागाकडे मेल द्वारे सादर करून नमुन्याची तपासणी करण्याची मागणी केली आहे. तसेच संबंधित उत्पादकाविरुद्ध आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्याची विनंती केली आहे. दरम्यान, या प्रकरणाबाबत अधिकृत तपासणी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नसून, वस्तूचे स्वरूप आणि कारण याबाबत अंतिम निष्कर्ष अन्न सुरक्षा विभागाच्या तपासणीनंतरच स्पष्ट होणार आहे. तसेच खबरदारी म्हणून इतर ग्राहकांनी दूध तसेच दुग्धजन्य पदार्थ, पनीर, तूप हे नीट तपासून खावेत असे तक्रारदार यांनी आवाहन केले आहे. आणि वेळप्रसंगी अशा अस्वच्छ कंपनी विरुद्ध कायदेशीर लढा देऊ असे तक्रादार यांनी सांगितले आहे. अन्न औषधचे अधिकारी नॉट रीचेबल आणि नो-रिस्पाँसीबल -या बाबत ''दै.पोलीस न्यूज''ने अन्न औषध विभागाच्या नगर कार्यालयाच्या अधिकाऱ्याशी संपर्क केला. अधिकाऱ्यांनी कर्जत विभाग पहाणार्या अधिकाऱ्याचा मोबाईल नंबर दिला. मात्र सदर नंबरवर अनेकदा फोन लावूनही फोन उचलण्यात आला नाही. त्यामुळे याबाबत अधिकचे स्पष्टीकरण मिळाले नाही.

## तब्बल ४६ वर्षानंतर उघडला आठवणींचा खजिना अन् दिग्गज मित्रांच्या रंगल्या दिलखुलास गप्पा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी** – शिर्डी आणि पंचक्रोशीतील अनेक दिग्गज मान्यवर तब्बल ४६ वर्षांपूर्वी ज्या बाकावर बसून एकत्र शिक्षण घेत होते, तोच मित्रपरिवार पुन्हा एकदा एकत्र आला. सन १९८० मधील श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचा एक आगळावेगळा स्नेहमेळावा नुकताच शिर्डीजवळील 'अगत्य कृषी पर्यटन रिसॉर्ट' येथे अत्यंत उत्साही आणि भावुक वातावरणात संपन्न झाला.

या मेळाव्याचे मुख्य सूत्रधार उद्योजक संजय लोढा यांनी पुढाकार घेऊन ४६ वर्षांनंतर विखुरलेल्या मित्रांना पुन्हा एकदा एका छताखाली आणले. या स्नेहमेळाव्यात शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलास बापू कोते, नांदुरखीचे माजी सरपंच राजेंद्र चौधरी, प्राध्यापक चौधरी सर, डॉ. गंगवाल, माजी सरपंच वाल्मीक तुरकणे, भाऊ थोरात आणि डॉ. लोढा यांसारख्या विविध क्षेत्रांत उच्च पदावर कार्यरत असलेल्या दिग्गज व्यक्तींनी हजेरी लावली होती.

मेळाव्याची सुरुवात अत्यंत भावूक क्षणांनी झाली. आपल्या जीवनाला दिशा देणाऱ्या आपल्या वंदनीय शिक्षकांचे आगमन होताच, सर्व मित्रांनी त्यांचे वाजत-गाजत आणि नृत्य करत जंगी स्वागत केले. शाल आणि हार देऊन गुरुजनांचा सत्कार करण्यात आला. इतक्या वर्षांनंतर एकमेकांना पाहिल्यामुळे ओळख पटवणे कठीण जात होते. स्वतः कैलास बापू कोते यांनी मजेशीर भाषेत, ''मी तुम्हा सर्वांच्या वर्गात होतो, हेच मला आठवत नाहीये,'' असे सांगताच एकच हास्यकल्लोळ उडाला. त्यानंतर, प्रत्येकाने आपली ओळख करून दिली आणि शालेय जीवनातील गमतीशीर किस्से सांगत आठवणींना उजाळा दिला. कैलास बापूंच्या नेहमीच्या शैलीतील प्रभावी भाषणाने उपस्थितांना खळखळून हसवले. एरव्ही गंभीर आणि आदरार्थी संबोधने ऐकणाऱ्या या मान्यवरांनी आज एकमेकांना पुन्हा एकदा मित्रत्वाने एकेरी हाक मारली, हा क्षण सर्वांसाठी खूप मोलाचा होता. जेवणाच्या वेळी कैलास बापू कोते यांनी जुन्या संस्कारांचे दर्शन घडवले. त्यांनी स्वतः गुरुजनांना पाणी नेऊन दिले आणि आपल्या मित्रांना स्वतः वाढून जेवणाचा आग्रह केला. त्यानंतर झालेल्या अंताक्षरी आणि विविध खेळांनी वातावरणात रंगत भरली. कार्यक्रमाचा शेवट हा गाण्यांच्या तालावर मनमुराद नृत्य करत करण्यात आला. तब्बल ४६ वर्षांनंतरचा हा आनंद सोहळा सर्वांच्या स्मरणात कायमचा कोरला गेला. यापुढे दरवर्षी असा स्नेहमेळावा भरवण्याचा संकल्प करत, सर्व मित्रांनी भावविभोर होऊन निरोप घेतला. या मेळाव्यामुळे काळ ४६ वर्षे मागे गेल्याची प्रचिती सर्वांना आली.

## महिला आर्थिक विकास महामंडळाची वार्षिक क्रेडिट प्लान कार्यशाळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) जिल्हा कार्यालयाच्या वतीने आयोजित वार्षिक क्रेडिट प्लान २०२६-२७ कार्यशाळेचे उद्घाटन विभागीय सल्लागार शैलेश पाटील आणि विभागीय उपजीविका सल्लागार नवनाथ नाईक यांच्या हस्ते हॉटेल अमर पॅलेस येथे संपन्न झाले.

कार्यशाळेस आयसीआयसीआय बँकेचे विभागीय व्यवस्थापक वैभव भाटिया, युनियन बँकेचे मुख्य व्यवस्थापक संदीप महादुळे, एचडीएफसी बँकेचे इंद्रजित चव्हाण, तौफिक देशमुख, बँक ऑफ महाराष्ट्रचे एस. ए. सावंत, खादी ग्रामोद्योगचे खलील हवालदार, जिल्हा उद्योग केंद्राचे निरीक्षक मनोज कुमार, बँक ऑफ बडोदाचे नितीन जाधव, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी उमेश कहाते आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शैलेश पाटील आणि नवनाथ नाईक यांनी महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बँकांनी अधिक सहकार्य करण्याची आवश्यकता व्यक्त केली. तसेच, जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या विविध उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना जिल्हा समन्वय अधिकारी उमेश कहाते यांनी माविमच्या जिल्ह्यातील कामकाजाची माहिती दिली. नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील २४७ गावांमध्ये काम सुरू असून, आतापर्यंत २ हजार ७४४ स्वयंसहाय्यता बचत गटांची स्थापना करण्यात आली आहे. या बचत गटांमध्ये सुमारे २७ हजारांहून अधिक ग्रामीण महिला सहभागी झाल्या आहेत. आतापर्यंत सुमारे २,००२ बचत गटांनी विविध बँकांकडून एकूण ३२४ कोटी ६ लाख रुपयांचे बँक कर्ज घेतले असून, कर्ज परतफेडीचे प्रमाण ९८.५ टक्के आहे. बचत गटांनी बँक व अंतर्गत कर्ज तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन विविध उद्योग-व्यवसाय सुरू केले असून, त्यामुळे सुमारे २१ हजारांहून अधिक महिला स्वावलंबी बनल्या आहेत.

माविममार्फत जिल्ह्यात ८ लोकसंचालित साधन केंद्रांची स्थापना करण्यात आली असून, ही केंद्रे महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी यशस्वीपणे कार्यरत आहेत. महिलांना संघटित करून शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्ह्यात १११ सूक्ष्म प्रकल्प राबविण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली.कार्यशाळेत राज्यस्तरीय नवतेजस्विनी प्रकल्पाचे सादरीकरण विभागीय सल्लागार शैलेश पाटील यांनी केले, तर सूक्ष्म कर्जविषयक सादरीकरण विभागीय उपजीविका सल्लागार नवनाथ नाईक यांनी केले. २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा जिल्हास्तरीय क्रेडिट प्लान उमेश कहाते यांनी सादर केला.कार्यशाळेचे सूत्रसंचालन नेहा परदेशी यांनी केले, तर आभारप्रदर्शन उपजीविका विकास अधिकारी प्रशांत पाटील यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी लेखाधिकारी गजानन ढोणे, जिल्हा प्रकल्प सल्लागार दीपक माने, एमआयएस सल्लागार योगेश कदम आणि लिपिक मच्छिंद्र कुऱ्हे यांनी परिश्रम घेतले.

## स्लॅबवरून कोसळून तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** घराच्या स्लॅब भरण्याचे काम सुरू असताना तोल जाऊन खाली पडल्याने २४ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी (दि. १२) दुपारी पाचोड येथील शिवाजीनगर परिसरात घडली. प्रदीप मुकेश पिंपळे (रा. पाचोड) असे मृत तरुणाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, प्रदीप पिंपळे यांचे कुटुंब गेल्या अनेक वर्षांपासून पाचोड येथे वास्तव्यास असून बिगारी व प्लंबिंगच्या कामातून उदरनिर्वाह करत होते. प्रदीप हे देखील वडिलांसोबत बांधकाम क्षेत्रातील विविध कामांमध्ये सहभागी होत होते.

शिवाजीनगर परिसरातील संतोष मेहतर यांच्या घराचे स्लॅब भरण्याचे काम सुरू असताना प्रदीप इतर कामगारांसोबत काम करत होते. सिमेंटने भरलेली हातगाडी सांभाळत असताना अचानक त्यांचा तोल गेला. स्लॅबच्या कडेला उभे असताना संतुलन बिघडल्याने ते थेट खाली कोसळले. या अपघातात त्यांच्या डोक्याला व छातीला गंभीर दुखापत झाली. घटनेनंतर परिसरातील नागरिक व सहकारी कामगारांनी तातडीने त्यांना पाचोड येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे पाचोड परिसरात हळहळ व्यक्त होत असून पिंपळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## आ. संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त सनी वागस्कर व मित्र परिवाराच्या वतीने तपोवन रोडवरील बालघर प्रकल्पातील विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, प्रकाश भागानगरे, महेश तवले, निलेश बांगरे, डॉ. सुनील भगत, अशोक काळे, अभिराज वागस्कर,अभिषेक घटमाळ, राहुल गिल्डा, वैभव गांधी, सुभाष चौभे, राहुल बुरा, भागवत कुरधने, संतोष लांडे, संतोष ढाकणे, सागर गुंजाळ,तसेच बालघर प्रकल्पाचे संचालक युवराज गुंड आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात सनी वागस्कर म्हणाले, ''आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी कार्यक्रम राबवावा, असा संकल्प केला.त्यानुसार गरजू, गोरगरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्याचा निर्णय घेतला. दरवर्षी मित्र मंडळाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.'' आमदार संग्राम जगताप यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव काळापहाड यांनी केले तर आभार अभिषेक घटमाळ यांनी मानले.

## मुस्लिम सामाजिक प्रतिष्ठाण तर्फे इ.१ ली ते १० वीपर्यंत गरीब गरजूना मोफत वह्या वाटप करणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर मुस्लिम सामाजिक प्रतीष्ठान या रजिस्टर्ड सेवा भावी संस्थे तर्फे दर वर्षी प्रमाणे या ही वर्षी ही अहिल्यानगर शहरातील गरीब गरजू विध्यार्थीना संस्थे मार्फत मोफत वह्या वाटप करण्याचे नियोजन करण्यात आले, असल्याचे मुस्लिम सामाजिक प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष आबिद हुसेन यांनी पत्रक द्वारे गरीब विध्यार्थीना अहवानं केले आहेत तरी गरजू विद्यार्थीने जास्तीत जास्त याचा लाभ घ्यावेत असे संस्थेच्या वतीने इ.पहीली ते दहावीपर्यंत विध्याथीना अहवानं करण्यात आले असून मोफत वह्यांन साठी संस्थे च्या पांचपीर चावडी येथीलकार्यालयात सपर्क करावा मुस्लिम सामाजिक प्रतीष्ठान संस्थापक अध्यक्ष आबिद हुसैन यांचा मोबाईल नंबर ९९२१५१५७५५ वर आधिक माहीत मिळेल.

## ज्ञानसंपदा शाळेत डॉ.जयंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सु-मन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिक्षकांनी बदलत्या सामाजिक, शैक्षणिक परिस्थितीशी जुळवून घ्यावे असे प्रतिपादन रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक डॉ.जयंत कुलकर्णी यांनी केले. बुधवार दिनांक १० जून २०२६ रोजी ज्ञानसंपदा शाळेत शिक्षक प्रशिक्षणांतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने शिक्षकांशी सुसंवाद साधण्यात आला.

डॉ. जयंत कुलकर्णी हे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीत कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत आहेत तसेच डी. इ .एस, पुणे विद्यापीठात शिक्षण विद्या शाखा प्रमुख आहेत. यांनी शिक्षण पद्धतीतील अत्यंत तर्कशुद्ध विचार मांडत, शैक्षणिक पार्श्वभूमी ,बदलत्या शिक्षण पद्धतीत अध्यापन करताना बदलत्या सामाजिक परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे, यावर भर दिला... ऐतिहासिक दृष्टिकोनः स्वातंत्र्यपूर्व शिक्षण, तेव्हाची क्ळा शिक्षणाचीची गरज, त्या काळात उभ्या राहिलेल्या समाजसुधारकांचे व शाळांचे योगदान यावर विस्तृत चर्चा केली.

. स्वातंत्र्यानंतरचे बदलः स्वातंत्र्यानंतर बदललेली शिक्षणाची गरज, सामाजिक परिस्थिती व सरकारी धोरणे याविषयी प्रसंगकथनाच्या माध्यमातून सखोल संवाद झाला.

. विद्यार्थी-केंद्रित अध्यापनः विद्यार्थ्यांना भावनिक स्तरावर समजून घेणे, त्यांच्यातील कौशल्ये ओळखणे व राष्ट्रभक्ती निर्माण करणे हे साचेबद्ध अध्यापनाने शक्य नाही. यासाठी विद्यार्थ्यांना प्रयोगशील बनवणे अधिक आवश्यक आहे, यावर एकमत झाले.

सध्याच्या अध्यापन करताना येणाऱ्या अडचणी सामाजिक समस्या व त्यानुसार सतत प्रयोगशील असण्याची गरज यावर अर्थपूर्ण संवाद साधला गेला.

या प्रशिक्षण कार्यशाळेत प्रमुख उपस्थिती संस्थेचे अध्यक्ष श्री प्रवीण बजाज, उपाध्यक्ष श्री. मिलिंद गंधे, मानद सचिव श्री. अरुण कुलकर्णी ,विश्वस्त श्रीहरी टिपूगडे, शैक्षणिक सल्लागार डॉ. सुनिता भागवत , सौ मृणाल पोतनीस, मुख्याध्यापिका शिवांजली अकोलकर, सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. मिलिंद गंधे यांनी आपले मनोगत व्यक्त करून सर्वांचे आभार मानले. तसेच श्री. अरुण कुलकर्णी यांनी स्पष्ट केले की, ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने आपली शाळा ही एक आदर्श ''प्रशिक्षण केंद्र'' बनवण्याच्या दृष्टीने आम्ही सर्वजण तसेच शाळेतील सर्व घटक प्रयत्नशील आहोत.

## आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेकडून सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी पतसंस्थेच्या पदाधिकारी व संचालक मंडळाने आमदार संग्राम जगताप यांच्या सामाजिक, राजकीय आणि कर्मचारी हिताच्या कार्याचा गौरव करत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी पतसंस्थेचे चेअरमन बाबासाहेब मुदगल, व्हाईस चेअरमन कैलास चावरे, तज्ञ संचालक जितेंद्र सारसर, ज्येष्ठ संचालक सतीश ताठे, विकास गीते, श्रीधर देशपांडे, बलराज गायकवाड, अजय कांबळे, बाळासाहेब पवार, विजय कोतकर, सोमनाथ सोनवणे, गुलाब गाडे, किशोर कानडे, बाळासाहेब गंगेकर, संचालिका प्रमिलाताई पवार, कार्यलक्ष्मी संचालक आनंद तिवारी यांच्यासह पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना चेअरमन बाबासाहेब मुदगल म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांनी नेहमीच महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी सकारात्मक भूमिका घेतली आहे. कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांनी राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. कर्मचारी हिताचे निर्णय व्हावेत, त्यांना न्याय मिळावा आणि त्यांच्या समस्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडल्या जाव्यात यासाठी त्यांनी वेळोवेळी पुढाकार घेतला आहे.

ते पुढे म्हणाले की, अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या कामकाजासाठीही आमदार संग्राम जगताप यांनी नेहमीच सहकार्याची भूमिका घेतली आहे. कर्मचारी वर्गाच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी पतसंस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांना त्यांनी पाठबळ दिले आहे. त्यामुळे कर्मचारी वर्गामध्ये त्यांच्याविषयी विशेष आदर आणि आत्मीयता आहे.

आमदार संग्राम जगताप यांचे लोकाभिमुख कार्य, सर्वसामान्यांशी असलेली बांधिलकी आणि कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांप्रती असलेली संवेदनशीलता यामुळे त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त पतसंस्थेच्या वतीने त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा देत त्यांच्या पुढील सामाजिक, राजकीय आणि विकासात्मक वाटचालीस यश लाभावे, हीच सदिच्छा आहे, असेही बाबासाहेब मुदगल यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित संचालक मंडळातील सदस्यांनीही आमदार संग्राम जगताप यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला. मनपा कर्मचारी आणि पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार सोहळा संपन्न केला.

# जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांचा भाजपच्या वतीने सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच जनतेशी सुसंवाद ठेवून पोलीस प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांचा भारतीय जनता पार्टी, अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी भाजप पदाधिकाऱ्यांनी त्यांना पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला.

या प्रसंगी भाजप दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, कर्जत तालुकाध्यक्ष अनिल गदादे, मन की बात अभियान प्रमुख प्रसाद ढोकरीकर तसेच गणेश भालसिंग यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांनी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पोलीस प्रशासनाने केलेल्या प्रयत्नांचा गौरव केला.

यावेळी सत्काराला उत्तर देताना पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन म्हणाले, ''पोलीस दलाचे कार्य हे केवळ कायद्याची अंमलबजावणी करण्यापुरते मर्यादित नसून समाजात सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. नागरिकांचा विश्वास आणि लोकप्रतिनिधींचे सहकार्य यामुळे पोलीस प्रशासन अधिक प्रभावीपणे काम करू शकते. भविष्यातही जनतेच्या सेवेसाठी आणि जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहू.''

दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग आपल्या मनोगतात म्हणाले, ''पोलीस अधीक्षक मुम्माक्का सुदर्शन यांनी जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पोलीस दलाने अनेक आव्हानात्मक परिस्थितींना समर्थपणे तोंड दिले आहे. जनतेशी सुसंवाद आणि तत्पर कार्यपद्धतीमुळे त्यांच्याबद्दल नागरिकांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे.''

शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते म्हणाले, ''पोलीस प्रशासन आणि नागरिक यांच्यातील समन्वय वाढविण्यासाठी सुदर्शन साहेबांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत. समाजातील विविध घटकांशी संवाद साधून त्यांनी लोकाभिमुख प्रशासनाचा आदर्श निर्माण केला आहे. गुन्हेगारी नियंत्रणासोबतच सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे कामही त्यांनी केले आहे. त्यांच्या कार्याला भविष्यातही यश लाभो, हीच अपेक्षा आहे.''

उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर म्हणाले, ''जिल्ह्याच्या विकासासाठी सुरक्षित वातावरण अत्यंत आवश्यक असते. पोलीस अधीक्षक सुदर्शन यांच्या नेतृत्वामुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक बळकट झाली आहे. शिस्तबद्ध आणि पारदर्शक प्रशासनामुळे पोलीस दलाची प्रतिमा उंचावली आहे. त्यांच्या कार्याचा सन्मान करणे म्हणजे जनसेवेचा गौरव करण्यासारखे आहे.''

कर्जत तालुकाध्यक्ष अनिल गदादे म्हणाले, ''ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या समजून घेऊन त्यावर संवेदनशीलतेने काम करण्याची सुदर्शन साहेबांची कार्यशैली प्रेरणादायी आहे. पोलीस प्रशासन सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी अनेक सकारात्मक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या कार्यामुळे नागरिक आणि पोलीस यांच्यातील दरी कमी झाली आहे. अशा अधिकाऱ्यांचा सन्मान होणे आवश्यक आहे.''

# सिंहस्थ कुंभमेळ्याला जागतिक अध्यात्मिक, सांस्कृतिक पर्यटन स्थळ म्हणून विकासाचे नियोजन

**केंद्रीय पर्यटन मंत्रालयाचे सचिव भुवनेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली शिर्डी येथे बैठक**
**टेंट सिटी, पर्यटन सुविधा, सांस्कृतिक उपक्रम व जागतिक प्रसिद्धीवर भर**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी–** नाशिक – त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या पार्श्वभूमीवर भाविक व पर्यटकांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासह सिंहस्थ कुंभमेळ्याला जागतिक आध्यात्मिक व सांस्कृतिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याच्या दृष्टीने शिर्डी येथे आज पर्यटनविषयक तयारीचा आढावा घेण्यात आला.

केंद्रीय पर्यटन मंत्रालयाचे सचिव भुवनेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली ही उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत कुंभमेळ्याच्या अनुषंगाने पर्यटन पायाभूत सुविधा, भाविकांसाठी सुविधा, सांस्कृतिक उपक्रम, ब्रँडिंग आणि देश–विदेशात प्रसिद्धी यासंदर्भातील नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. नाशिक–त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या तयारीच्या सद्यस्थितीचे सादरीकरण केले. यामध्ये सुरू असलेले नियोजन, प्रस्तावित पायाभूत सुविधा, विविध विभागांमधील समन्वय आणि कुंभमेळ्याच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी हाती घेतलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली.

नाशिक विभागीय आयुक्त तथा नाशिक–त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम हे बैठकीस



दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. शिर्डी येथील बैठकीस श्री साईबाबा संस्थान ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश गटणे, पर्यटन संचालनालयाचे संचालक मंगेश जोशी, एमटीडीसीचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, एमटीडीसी नाशिकचे प्रादेशिक व्यवस्थापक जगदीश चव्हाण, पर्यटन संचालनालय नाशिकचे उपसंचालक नंदकुमार राऊत, श्री साईबाबा संस्थान ट्रस्टचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे आदी उपस्थित होते.

सिंहस्थ काळात येणाऱ्या भाविक व पर्यटकांसाठी टेंट सिटी, सांस्कृतिक केंद्रे, इंटरप्रिटेशन सेंटर, डिजिटल अनुभव केंद्रे आणि प्रदर्शन सुविधा विकसित करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. महाराष्ट्राची समृद्ध संस्कृती, पारंपरिक कला आणि स्थानिक कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी कलाग्राम/कल्चरल हाट उभारणीवर विशेष भर देण्यात आला. पर्यटक सुविधा केंद्रे, डिजिटल सेवा, बहुभाषिक मदत व्यवस्था व भाविकांसाठी आवश्यक सुविधांच्या नियोजनाचाही यावेळी आढावा घेण्यात आला.

इन्क्रेडिबल इंडिया अंतर्गत सिंहस्थ कुंभमेळ्याची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्धी, पर्यटन सर्किट, विविध पर्यटन स्थळांमधील कनेक्टिव्हिटी तसेच हेली–टुरिझमसारख्या नावीन्यपूर्ण उपक्रमांवरही चर्चा करण्यात आली. पर्यटन क्षेत्राशी संबंधित घटकांचे प्रशिक्षण, क्षमता वृद्धी आणि मागील कुंभमेळ्यांमधील यशस्वी उपक्रमांचा अभ्यास करून त्याची अंमलबजावणी करण्याबाबतही बैठकीत विचारविनिमय करण्यात आला.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ जाहीर

**पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्ती; नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ । पात्र शेतकऱ्यांनी आधार क्रमांकाशी भ्रमणध्वनी क्रमांक संलग्न (लिंक) करून घ्यावा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यातील शेतकऱ्यांना थकीत कर्जाच्या ओझ्यातून दिलासा देण्यासाठी तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' जाहीर केली आहे. सर्व पात्र शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी तातडीने आधार क्रमांक उपलब्ध करून घ्यावा तसेच आधार क्रमांकाशी चालू भ्रमणध्वनी क्रमांक संलग्न (लिंक) करून घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

राज्यातील नैसर्गिक आपत्ती, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट व इतर कारणांमुळे अनेक शेतकऱ्यांना पीक कर्जाची वेळेत परतफेड करणे शक्य झाले नाही. त्यामुळे थकबाकीदार शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याची बाब लक्षात घेऊन शासनाने पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे.

या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित करण्यात आलेल्या अल्पमुदत पीक कर्जांचा विचार करण्यात येणार असून, ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली व ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली कर्जे पात्र ठरणार आहेत. पात्र शेतकऱ्यांना प्रति शेतकरी कमाल २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. तसेच यापूर्वी महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ चा लाभ घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत कर्जमुक्ती देण्यात येणार आहे. ज्या शेतकऱ्यांची थकबाकी निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक आहे, त्यांनी 'एकरकमी समझोता' योजनेअंतर्गत अतिरिक्त रक्कम स्वतः भरल्यास ते शासनाच्या कर्जमुक्ती योजनेच्या लाभासाठी पात्र ठरतील. यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

शासनाने आर्थिक शिस्तीला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष तरतूद केली असून, सन २०२२–२३, २०२३–२४ व २०२४–२५ या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना कमाल ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणीकरण तसेच ॲग्रीस्टॅक () पोर्टलवरील नोंदणी अनिवार्य राहणार आहे. योजनेची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असून, शासनामार्फत याबाबत स्वतंत्र मार्गदर्शक सूचना लवकरच प्रसिद्ध करण्यात येतील. आधार क्रमांक, बँक खात्यांची माहिती किंवा ऑनलाइन नोंदणी अपूर्ण असल्यामुळे अनेक पात्र शेतकरी विविध योजनांच्या लाभापासून वंचित राहतात. त्यामुळे सर्व पात्र शेतकरी बांधवांनी आपले आधार क्रमांक, बँक खाते, भ्रमणध्वनी क्रमांक व जमीन नोंदी अद्ययावत करून घ्याव्यात. तसेच मयत खातेदारांच्या वारसांची नोंद अद्ययावत करून ॲग्रीस्टॅक नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# टाळ–मृदुंगाच्या गजरात आमदार संग्राम जगताप यांचे स्वागत; वारकरी फडकरी दिंडी समाज संघटनेकडून अनोखा वाढदिवस साजरा

**बाल वारकऱ्यांचा दिंडी सोहळा; संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमला**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहराचे आमदार संग्राम जगताप यांचा वाढदिवस विविध सामाजिक, धार्मिक आणि जनहिताच्या उपक्रमांनी उत्साहात साजरा होत असताना वारकरी फडकरी दिंडी समाज संघटनेच्या वतीने त्यांचे आगळ्यावेगळ्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. टाळ–मृदुंगाच्या गजरात, हरिनामाच्या जयघोषात आणि भक्तिरसाने

भरलेल्या वातावरणात आमदार संग्राम जगताप यांना वारकरी फेटा बांधून सत्कार करण्यात आला. यावेळी 'विनाभेट' उपक्रम राबवत समाजोपयोगी संदेश देण्यात आला.

या प्रसंगी बाल वारकऱ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत दिंडी सोहळ्यात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. टाळ–मृदुंगाच्या निनादावर बाल वारकरी एकाच ठेक्यावर नाचत होते. विठ्ठल–रुक्मिणीच्या नामस्मरणाने आणि अभंगगायनाने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. धार्मिक परंपरा, संस्कृती आणि वारकरी संप्रदायाचे संस्कार जपणारा हा सोहळा उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरला.

यावेळी ह.भ.प. संदीप महाराज खोसे, पैलवान शिवाजी चव्हाण, ह.भ.प. ईश्वर महाराज कदम, ह.भ.प. तुकाराम महाराज कातोरे, ह.भ.प. राधाकिसन महाराज कातोरे, ह.भ.प. धनंजय महाराज ससे, ह.भ.प. अभंग महाराज सोमवंशी, ह.भ.प. ऋषिकेश महाराज खोसे, ह.भ.प. माधव महाराज कोरे, ह.भ.प. ईश्वर महाराज गडाख, ह.भ.प. श्रीराम महाराज अनारसे, ह.भ.प. देविदास महाराज बारस्कर, शिवाजी पवार, पैलवान युवराज चव्हाण, बाळासाहेब लवांडे आदींसह बाल वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना ह.भ.प. संदीप महाराज खोसे म्हणाले की, ''धर्म रक्षावया आटी करणे आम्हासी'' या संतवचनाप्रमाणे धर्मरक्षणासाठी कार्य करणाऱ्या आणि



हिंदू संस्कृतीच्या जतनासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या आमदार संग्राम जगताप यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी वारकरी फडकरी दिंडी समाज संघटना एकत्र आली आहे. समाजातील अन्याय आणि अत्याचाराविरोधात ठामपणे उभे राहून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ते सातत्याने संघर्ष करतात. धर्म, संस्कृती आणि परंपरा जिवंत राहण्यासाठी त्यांचे योगदान महत्त्वाचे असून समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी ते कार्यरत आहेत. वारकरी संप्रदायाच्या विविध प्रश्नांबाबतही त्यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून आवाज उठविला आहे. त्यामुळे वारकरी समाजामध्ये त्यांच्याविषयी विशेष आत्मीयता आणि आदराची भावना आहे, असे त्यांनी सांगितले.

पैलवान शिवाजी चव्हाण म्हणाले की, आमदार संग्राम जगताप हे वारकरी, फडकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी वर्षभर संघर्ष करत असतात. वारकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी सातत्याने भूमिका घेतली असून गोरक्षणासारख्या सामाजिक आणि धार्मिक कार्यांमध्येही ते सक्रिय सहभाग घेतात. त्यांच्या या कार्याचा गौरव व्हावा आणि नव्या पिढीला वारकरी परंपरेचे संस्कार मिळावेत, या उद्देशाने वारकरी फडकरी दिंडी समाज संघटनेच्या वतीने बाल दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या माध्यमातून भक्ती, संस्कार आणि समाजसेवेचा संदेश देण्यात आला. मोठ्या धार्मिक उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थित विविध महाराजांनी आमदार संग्राम जगताप यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक, धार्मिक आणि जनहिताच्या कार्याचे कौतुक केले. बाल वारकऱ्यांच्या सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली असून वारकरी परंपरेचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणारा हा उपक्रम असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. टाळ–मृदुंगाच्या गजरात, हरिनामाच्या जयघोषात आणि भक्तीच्या उत्स्फूर्त वातावरणात हा दिंडी सोहळा उत्साहात संपन्न झाला.

(पान १ वरून)

## सबका साथ, सबका विकास हा मंत्र केवळ कागदावर न राहता देशातील विकासात्मक वाटचालीतून प्रत्यक्षात उतरला - ना. राधाकृष्ण विखे

जीवन अधिक सुकर झाले आहे. ६ कोटींहून अधिक लोक डिजिटल साक्षर झाले असून, युपीआय () व्यवहारांमध्ये १२ हजार पटींची वाढ झाली आहे. डिजिटल पेमेंटच्या बाबतीत भारत देश आज जगात आघाडीवर आहे. पंतप्रधान मोदीजींच्या नेतृत्वाखाली देशाची अर्थव्यवस्था लवकरच जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वासही मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केला. मेक इन इंडियाच्या माध्यमातून उत्पादन क्षेत्राला मोठे पाठबळ मिळाले असून, भारत देश आता सेमीकंडक्टर उत्पादनाचे जागतिक केंद्र बनला आहे. मोबाईल निर्मितीमध्येही भारत दुसऱ्या स्थानी आला आहे. संरक्षण उत्पादनांमध्ये देशाने मोठी प्रगती केली असून, या उत्पादनांचा निर्यातदार म्हणून आता भारत देशाची ओळख झाली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातही संरक्षण उत्पादनाचा कार्यान्वित झालेला प्रकल्प हा स्टार्टअपला मिळालेल्या पाठबळाचे यश असल्याचे सांगून, देशातील स्टार्टअपची संख्या आता २.२३ लाखांच्या पुढे गेली आहे. वारसा आणि विकास यांची सांगड घालून मागील १२ वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी १,७०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. अयोध्येतील श्रीराम मंदिर, काशी विश्वनाथ कॉरिडॉर आणि उज्जैनचे महाकाल लोक यांद्वारे केंद्र सरकारने लाखो भारतीयांच्या श्रद्धेचा सन्मान केला असल्याचे त्यांनी सांगितले.

## वृद्ध शेतकरी खून प्रकरणातील फरार आरोपीला १२ तासांत बेड्या

वाद झाला होता. या वादाचे पर्यावसान मोठ्या भांडणात झाले. राग अनावर झाल्याने आरोपी विलास गावडे याने पोपटराव गावडे यांच्या डोक्यावर कुऱ्हाडीने गंभीर वार केले. या हल्ल्यात पोपटराव यांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम १०३, ३५२ आणि ३५१(२) अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी हरीश भोये यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांची दोन स्वतंत्र पथके आरोपीच्या शोधासाठी रवाना करण्यात आली. दरम्यान, आरोपी विलास गावडे हा पोलिसांना चकवा देण्यासाठी आपले अस्तित्व लपवून पाथर्डी तालुक्यातील मढी मायंबा शिवार परिसरात लपून बसल्याची खात्रीशीर माहिती पथकाला मिळाली.पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, अनंत सालगुडे, परिविक्षाधीन उपनिरीक्षक पुष्कर कडु आणि सहकाऱ्यांनी अत्यंत गोपनीयतेने मढी गड आणि परिसरात शोधमोहीम राबवली. अखेर दबा धरून बसलेल्या आरोपीला पोलिसांनी शिताफीने घेरून ताब्यात घेतले.

ताब्यात घेतलेल्या आरोपीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी आणि तपासासाठी श्रीगोंदा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून त्याला अटक करण्यात आली आहे.

## तलवार बाळगणारा सराईत गुन्हेगार जेरबंद

ॲक्ट कलम ४/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक फौजदार थोरवे करत आहेत.सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बालाजी वैद्य, उपनिरीक्षक योगेश चाहेर, अरुण गांगुर्डे, भानुदास खेडकर, अब्दुलकादर इनामदार व गुन्हे शोध पथकाने केली.

## उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त नगरसेवक निखिल वारे यांच्याकडून १०० वृक्षांची अनोखी भेट

माझ्याकडून दहा ते पंधरा फूट उंचीची विविध जातींची १०० वृक्ष भेट देण्यात आली आहेत. पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास, वाढते तापमान, प्रदूषण आणि घटणारे हरित क्षेत्र यामुळे भविष्यात मानवासमोर मोठे प्रश्न निर्माण होऊ शकतात. त्यासाठी आतापासूनच वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची व्यापक चळवळ उभी करणे आवश्यक आहे. अहिल्यानगर शहराला हरित सिटी बनविण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेत या मोहिमेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, नगरसेवक निखिल वारे यांनी माझ्या वाढदिवसानिमित्त १०० वृक्षांची भेट देऊन पर्यावरण संवर्धनाचा अत्यंत सकारात्मक संदेश दिला आहे. आपले सण, उत्सव आणि वाढदिवस हे केवळ औपचारिक न राहता समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून साजरे झाले पाहिजेत. त्यामुळे समाजामध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि सामाजिक बांधिलकीची जाणीवही दृढ होते.

ते पुढे म्हणाले की, माझ्या वाढदिवसानिमित्त मी नागरिकांना आवाहन केले होते की कोणीही बुके किंवा पुष्पगुच्छ आणू नयेत. त्याऐवजी वृक्ष, शालेय साहित्य किंवा समाजोपयोगी वस्तू भेट द्याव्यात. या आवाहनाला नगरकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून मोठ्या प्रमाणात वृक्ष भेट स्वरूपात मिळाले आहेत. हे सर्व वृक्ष शहरातील विविध भागांमध्ये लावून त्यांचे संवर्धन केले जाणार आहे.

ॲड. जाधव म्हणाले की, आजच्या सोशल मीडियाच्या युगामध्ये अनेकजण पर्यावरण संवर्धनाबाबत पोस्ट आणि संदेश शेअर करतात; मात्र प्रत्यक्ष कृती करणाऱ्यांची संख्या कमी आहे. काहीजण जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करून फोटोसेशन करतात, पण त्यानंतर त्या वृक्षांची काळजी घेतली जात नाही. केवळ वृक्ष लावणे नव्हे तर त्याचे संवर्धन करणेही तेवढेच महत्त्वाचे आहे.

नामदार राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेअंतर्गत शहरात एक लाख वृक्ष लागवड आणि संवर्धनाचा संकल्प करण्यात आला आहे. या मोहिमेच्या माध्यमातून अहिल्यानगरला स्वच्छ, सुंदर, हरित आणि पर्यावरणपूरक शहर बनविण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून वृक्षारोपणाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा प्रयत्न सुरू आहे. उपस्थित मान्यवरांनी नगरसेवक निखिल वारे यांच्या पर्यावरणपूरक उपक्रमाचे तसेच उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या ग्रीन सिटी मोहिमेचे कौतुक करत शहराच्या हरित भविष्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले. या प्रसंगी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नागरिकांनी मोठ्या संख्येने या मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.